# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १२४ /२०२०

**विषय : प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित (Backlog Subjects) व श्रेणी सुधार (Performance Improvement Examination) ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे आयोजन करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित (Backlog Subjects) व श्रेणी सुधार (Performance Improvement Examination) ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित (Backlog Subjects) व श्रेणी सुधार (Performance Improvement Examination) ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे नियोजन दिनांक ८ डिसेंबर, २०२० ते दिनांक २३ डिसेंबर, २०२० दरम्यान करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त Online बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील. या परीक्षेमध्ये ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम व २० टक्के कठीण या काठिण्यपातळीचे प्रश्न असतील.

२. सदर परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३. प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित (Backlog Subjects) व श्रेणी सुधार (Performance Improvement Examination) ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलव्दारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

४. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही सेव्ह होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल.

५. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी परीक्षेमधील नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test/Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी दिनांक ३ डिसेंबर, २०२० ते दिनांक ५ डिसेंबर, २०२० या कालावधीत करण्यात येईल व तसे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

६. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

७. प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित (Backlog Subjects) व श्रेणी सुधार (Performance Improvement Examination) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा या परीक्षा विभागाचे पत्र क्र.परीक्षा-समन्वय/४१९, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी प्रसिध्द केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमावर होतील.

८. Online पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ)परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

९. सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी व परीक्षेदरम्यान येणा-या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in मध्ये लागीन करुन आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबंधित महाविद्यालय/संस्थेमध्ये संपर्क साधावा.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/ ८२६
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा